राज्यात विविध जिल्ह्यात जून, २०२५ ते ऑगस्ट, २०२५ या कालावधीत अतिवृष्टी व पूर यामुळे झालेल्या शेतीपिकांच्या नुकसानीपोटी बाधितांना मदत देण्याबाबत...

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक- सीएलएस २०२५/प्र.क्र. २३५ (भाग-८) /म-३**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- २३ सप्टेंबर, २०२५

वाचा :-

१) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र. संकीर्ण.क्र.६७/म-११,दि.२४.०१.२०२३.
२) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र.सीएलएस-२०२२/प्र.क्र.३४९/म-३,दि.२७.०३.२०२३
३) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र.सीएलएस-२०२५/प्र.क्र.२०/म-३,दि.३०.०५.२०२५
४) विभागीय आयुक्त, अमरावती यांचे पत्र क्र. उपआ/नैआ/महसूल/ म. स./कावि १६५/२०२५, दि. १७.०९.२०२५
५) विभागीय आयुक्त, अमरावती यांचे पत्र क्र. उपआ/नैआ/महसूल/ म. स./कावि १६८/२०२५, दि. २२.०९.२०२५
६) विभागीय आयुक्त, नागपूर यांचे पत्र क्र. मशा-७(५)/नै. आ. व्य./गोंदिया जून-२५/कावि-४२९/ १२.०९.२०२५
७) विभागीय आयुक्त, नागपूर यांचे पत्र क्र. मशा-७(५)/नै. आ. व्य./गोंदिया जुलै-२५/कावि-४२८/ १२.०९.२०२५
८) विभागीय आयुक्त, नागपूर यांचे पत्र क्र. मशा-७(५)/नै. आ. व्य./भंडारा जुलै-२५/कावि-४२७/ १२.०९.२०२५
९) विभागीय आयुक्त, नागपूर यांचे पत्र क्र. मशा-७(५)/नै. आ. व्य./गडचिरोली जुलै-२५/कावि-४४८/ १७.०९.२०२५
१०) विभागीय आयुक्त, नागपूर यांचे पत्र क्र. मशा-७(५)/नै. आ. व्य./गडचिरोली ऑगस्ट-२५/कावि-४५९/ १९.०९.२०२५
११) विभागीय आयुक्त, नागपूर यांचे पत्र क्र. मशा-७(५)/नै. आ. व्य./वर्धा ऑगस्ट -२५/कावि-४४९/ १७.०९.२०२५
१२) विभागीय आयुक्त, नागपूर यांचे पत्र क्र. मशा-७(५)/नै. आ. व्य./नागपूर ऑगस्ट -२५/कावि-४५८/ १९.०९.२०२५
१३) विभागीय आयुक्त, पुणे यांचे पत्र क्र.मह-३/नै. आ./कावि /२३८/२०२५/, १७.०९.२०२५
१४) विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांचे पत्र क्र. जा. क्र. २०२५/मशाका/नैआ-१७१२, दिनांक १८.०९.२०२५
१५) विभागीय आयुक्त, नाशिक यांचे पत्र क्र. मशा/टंचाई/शेतीपीक नुकसान/ज-३/१२०२०/१२१, दि. १८.०९.२०२५

**प्रस्तावना:-**

अतिवृष्टी, पूर व चक्रीवादळ यासारख्या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतीपिकांचे नुकसान झाल्यास पुढील हंगामामध्ये उपयोगी पडावे याकरिता शेतकऱ्यांना निविष्ठा अनुदान (Input subsidy) स्वरूपात एका हंगामात एक वेळेस याप्रमाणे राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमधून विहित दराने मदत देण्यात येते. तसेच, राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या इतर मान्य बाबींकरिता देखील विहित दराने मदत देण्यात येते. शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र.सीएलएस-२०२२/प्र.क्र.३४९/म-३, दि.२७.०३.२०२३ अन्वये राज्य आपत्ती प्रतिसाद निधीचे निकष व दर विहित करण्यात आले आहेत. केंद्र शासनाने विहित केलेल्या १२ नैसर्गिक आपत्तींव्यतिरिक्त राज्य शासनाने दि.३०.०१.२०१४ अन्वये अवेळी पाऊस, अतिवृष्टी, वीज कोसळणे, समुद्राचे उधाण व आकस्मिक आग या स्थानिक आपत्तींमध्ये बाधित होणाऱ्या नागरिकांना मदत देण्याचे धोरण निश्चित केले आहे. तसेच, दि.२२.६.२०२३ च्या शासन निर्णयान्वये सततचा पाऊस ही नैसर्गिक आपत्ती घोषित करण्यात आली आहे.

२. खरीप २०२५ व या पुढील कालावधीकरीता केंद्र / राज्य शासनाने अधिसूचित केलेल्या नैसर्गिक आपत्तींमुळे झालेल्या शेती पिक नुकसानीबाबत द्यावयाचे निविष्ठा अनुदानाचे दर व निकष शासन निर्णय दिनांक २७.०३.२०२३ प्रमाणे देय राहील, असा निर्णय दिनांक ३०.०५.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे. त्यानुसार दिनांक २७.०३.२०२३ रोजीच्या शासन निर्णयातील निकष व दर यानुसार विभागीय आयुक्त यांनी निधी मागणीचा प्रस्ताव संदर्भ क्र. ४ ते १५ येथील पत्रान्वये माहे जून, २०२५ ते ऑगस्ट, २०२५ मध्ये “अतिवृष्टी व पूर” यामुळे झालेल्या शेतीपिकांच्या नुकसानीसाठी निधी मागणीचा प्रस्ताव सादर केला आहे. त्यानुषंगाने खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आलेला आहे.

**शासन निर्णय :-**

जून, २०२५ ते ऑगस्ट, २०२५ या कालावधीत राज्यात विविध जिल्ह्यांत “अतिवृष्टी व पूर” यामुळे शेतीपिकांच्या नुकसानीसाठी शेतकऱ्यांना मदत देण्याकरिता संदर्भाधीन क्र.२ येथील शासन निर्णयान्वये निश्चित केलेल्या दरानुसार एकूण रुपये १३३९,४९,२५,०००/- (रूपये एक हजार तीनशे एकोणचाळीस कोटी एकोणपन्नास लक्ष पंचवीस हजार फक्त) इतका निधी वितरीत करण्यास शासनाची मंजूरी देण्यात येत आहे.

२. या शासन निर्णयासोबत जोडलेल्या प्रपत्रात दर्शविल्याप्रमाणे उपलब्ध तरतुदीमधून अथवा आवश्यकतेनुसार पुर्नविनियोजनाव्दारे तरतुद उपलब्ध करुन घेऊन कार्यासन म-११ यांनी हा निधी वितरित करावा.

३. संदर्भाधीन अनुक्रमांक १ येथे नमूद दि.२४.०१.२०२३ अन्वये सूचित केल्यानुसार DBT पोर्टलव्दारे लाभार्थ्यांना थेट त्यांच्या बँक खात्यात निधी वितरीत करण्यात यावा. सोबतच्या प्रपत्रामधील सर्व लाभार्थ्यांची माहिती विहित नमुन्यात काळजीपूर्वक तयार करुन संबंधित अधिकाऱ्यांनी ती संगणकीय प्रणालीवर भरुन मान्यतेबाबत नियमानुसार कार्यवाही करावी. तथापि,

अ) चालू हंगामामध्ये यापूर्वी सर्व विभागांना शेतीपिकांच्या नुकसानीकरिता वितरीत करण्यात आलेल्या मदतीच्या निधीमध्ये या प्रस्तांवातर्गत मागणी करण्यात आलेल्या निधीचा समावेश नाही याची दक्षता घ्यावी. एका हंगामात एक वेळेस याप्रमाणे विहित दराने मदत देण्यात येत असल्याची खात्री करावी.

ब) कोणत्याही लाभार्थ्यांना मदत देतांना व्दिरुक्ती होणार नाही याची तहसिल व जिल्हाधिकारी कार्यालयाने कटाक्षाने काळजी घ्यावी.

४. वरील निधी खर्च करताना संदर्भाधीन सर्व शासन निर्णयातील सुचनांचे व निकषांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. ज्या प्रयोजनासाठी निधी मंजूर करण्यात आला आहे त्याच प्रयोजनासाठी सदर निधी खर्च करण्यात यावा. ही मदत देताना नैसर्गिक आपत्तीकरिता विहित केलेल्या अटी व शर्तीची पूर्तता होत असल्याची खात्री सर्व संबंधितांनी करावी.

५. लाभार्थ्यांना मदत वाटपाची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर लाभार्थ्यांची यादी व मदतीचा तपशील जिल्ह्यांच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावा. या आदेशाव्दारे तसेच यापूर्वी वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशाव्दारे नैसर्गिक आपत्तीमध्ये शेतकऱ्यांना दिलेला मदतीचा निधी बँकांनी कर्ज खात्यात अथवा अन्यथा वसुलीसाठी वळती करु नये याकरिता जिल्हाधिकारी यांनी सर्व बँकांना आवश्यक त्या सूचना निर्गमित कराव्यात. या सर्व सूचनांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी यांची राहील.

६. सदर निधीतून करण्यात येत असलेल्या खर्चाचे लेखे निधी आहरित करण्यात येणाऱ्या कार्यालयाच्या स्तरावर ठेवण्यात यावे व करण्यात आलेल्या खर्चाचा कोषागार कार्यालये व

महालेखापाल कार्यालयाशी त्रैमासिक ताळमेळ घेण्यात यावा व उपलब्ध करून दिलेला उपरोक्त निधी खर्ची पडल्यानंतर तातडीने निधीची उपयोगिता प्रमाणपत्रे संबंधितांकडून प्राप्त करून घेवून एकत्रितरित्या शासनास सादर करण्याची जबाबदारी विभागीय आयुक्त यांची राहील.

७. वरील प्रयोजनासाठी, संदर्भ क्र.२, दिनांक २७.०३.२०२३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या निकषानुसार व दरानुसार, २ हेक्टर मर्यादेतील शेतीपिक नुकसानीचा खर्च मागणी क्र.सी-६; मुख्य लेखाशिर्ष २२४५ नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी अर्थसहाय, ०२ पुर, चक्रीवादळे इत्यादी, १०१, अनुग्रह सहाय्य; (९१) राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या मानकानुसार खर्च; (९१) (०५) नैसर्गिक आपत्तीमुळे पिकनुकसानीकरिता शेतकऱ्यांना सहाय्य (अनिवार्य); ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर) (सशर्त) (२२४५ २४५२) या लेखाशीर्षाखाली भागविण्यात येईल.

सदरचा खर्च आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये उपलब्ध असलेल्या निधीमधून/ पुनर्विनियोजनाव्दारे उपलब्ध केलेल्या निधीमधून खर्च करण्यात यावा.

८. याबाबतची देयक अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई यांना सादर करण्याकरीता शासन निर्णय क्र. ओएफएम-१०/०७/प्र.क्र.२०२/ई, दिनांक १६.१०.२००७ अन्वये लेखाधिकारी, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग यांना आहरण व संविरण अधिकारी आणि वित्तीय सल्लागार व सह सचिव यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे.

९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०२५०९२३११०८२०५८१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

**(संपत सूर्यवंशी)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

१. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,मंत्रालय,मुंबई,
२. मा.उपमुख्यमंत्री (नगर विकास ) यांचे सचिव,मंत्रालय,मुंबई
३. मा.उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे सचिव,मंत्रालय,मुंबई
४. मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/विधानसभा, महाराष्ट्र विधानभवन,मुंबई

५. मा. मंत्री (मदत, पुनर्वसन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. विधानमंडळाचे सर्व सन्माननीय सदस्य,
७. अपर मुख्य सचिव ( वित्त ), मंत्रालय,मुंबई,
८. अपर मुख्य सचिव (कृषि), मंत्रालय, मुंबई
९. विभागीय आयुक्त, अमरावती, नागपूर, पुणे, छत्रपती संभाजीनगर , नाशिक
१०.वित्तिय सल्लागार व सहसचिव,मदत व पुनर्वसन प्रभाग,मंत्रालय,मुंबई
११.संचालक, लेखा व कोषागारे ,मुंबई
१२.सर्व संबंधित जिल्हाधिकारी
१३.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) १/२, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
१४.महालेखापाल (लेखा परिक्षा) १/२,महाराष्ट्र,मुंबई/नागपूर,
१५.सर्व संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी
१६.कार्यासन अधिकारी (म-११/म-३), मदत व पुनर्वसन प्रभाग,मंत्रालय,मुंबई
१७.वित्त विभाग (कार्यासन व्यय-९/अर्थ-६),मंत्रालय,मुंबई
१८.निवड नस्ती (कार्यासन/ म-३ )

| शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र. संकीर्ण.क्र. सीएलएस-२०२५ / प्र.क्र.२३५ (भाग-८) /म-०३, दि. २३ सप्टेंबर, २०२५ सोबतचे विवरणपत्र | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | विभाग | जिल्हा | कालावधी | प्रस्तावाचा दिनांक | बाधित शेतकरी संख्या | बाधित क्षेत्र - हेक्टर | निधी (रु. लक्ष) |
| १ | **अमरावती** | अमरावती | जुलै-ऑगस्ट-२०२५ | १७.०९.२०२५ | १६८५३३ | १२३७६३.६९ | १०८७१.४४ |
| | | अकोला | जुलै २०२५ | | ११५९७ | ७३१०.९३ | ६२१.६३ |
| | | यवतमाळ | जुलै २०२५ | | १९९५ | १२२१.२८ | १०३.८१ |
| | | बुलढाणा | जुलै २०२५ | | २७७४९ | ३१५४२.३२ | २६८१.१० |
| | | वाशिम | जुलै २०२५ | | ३०८८ | २०१५.०८ | १७१.३९ |
| | | | | **एकूण** | **२१२९६२** | **१६५८५३.३** | **१४४४९.३७** |
| | | यवतमाळ | ऑगस्ट-२०२५ | २२.०९.२०२५ | २२४६५७ | २०९६२४.८० | १८२३८.५६ |
| | | बुलढाणा | ऑगस्ट-२०२५ | | १५२६१९ | १११८४७.५९ | ९५०८.३३ |
| | | वाशिम | ऑगस्ट-२०२५ | | १९८७३६ | १६७२६९.७३ | १४३६४.०४ |
| | | | | **एकूण** | **५७६०१२** | **४८८७४२.१२** | **४२११०.९३** |
| | | | | **एकूण विभागीय आयुक्त, अमरावती** | **७८८९७४** | **६५४५९५.४२** | **५६५६०.३०** |
| २ | **नागपूर** | गोंदिया | जून-२०२५ | १२.०९.२०२५ | ३२ | ११.५० | १.९६ |
| | | गोंदिया | जुलै २०२५ | १२.०९.२०२५ | ३२४ | २४६.६२ | २१.४८ |
| | | भंडारा | जुलै २०२५ | १२.०९.२०२५ | ८२८३ | २५८९.१२ | ४३३.२५ |
| | | गडचिरोली | जुलै २०२५ | १७.०९.२०२५ | १६४८८ | ९७७७.८७ | ११९१.७४ |
| | | गडचिरोली | ऑगस्ट-२०२५ | १९.०९.२०२५ | १८१९ | ११३४.८६ | ९८.१२ |
| | | वर्धा | ऑगस्ट-२०२५ | १७.०९.२०२५ | ९१०७ | ६३८०.६८ | ५४२.७४ |
| | | नागपूर | ऑगस्ट-२०२५ | १९.०९.२०२५ | १५७८ | १०८३.९९ | ९५.९७ |
| | | | | **एकूण विभागीय आयुक्त, नागपूर** | **३७६३१** | **२१२२४.६४** | **२३८५.२६** |
| ३ | **पुणे** | कोल्हापूर | ऑगस्ट-२०२५ | १७.०९.२०२५ | ३६५५९ | ८८३५.१५ | १४२८.५२ |
| | | | | **एकूण विभागीय आयुक्त, पुणे** | **३६५५९** | **८८३५.१५** | **१४२८.५२** |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | **छत्रपती संभाजीनगर** | हिंगोली | ऑगस्ट-२०२५ | १८.०९.२०२५ | ३०४८२९ | २७१५८६.८९ | २३१२७.९२ |
| | | बीड | ऑगस्ट-२०२५ | | ११४७७३ | ६६७३१.८० | ५६७३.९० |
| | | लातूर | ऑगस्ट-२०२५ | | ३८०५११ | २८७१५१.२० | २४४३५.३७ |
| | | धाराशिव | जुलै - ऑगस्ट-२०२५ | | २३४९५५ | २२२९७५.४८ | १८९६०.६७ |
| | | **एकूण विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर** | | | **१०३५०६८** | **८४८४४५.३७** | **७२१९७.८६** |
| ५ | **नाशिक** | नाशिक | ऑगस्ट-२०२५ | १८.०९.२०२५ | ७१०८ | ४०१४.३२ | ३८१.६७ |
| | | धुळे | | | ७२ | २३.९५ | २.०४ |
| | | नंदुरबार | | | २५ | ११.८८ | १.०१ |
| | | जळगांव | | | १७३३२ | ८०२७.९८ | ९८६.२९ |
| | | अहिल्यानगर | | | १४० | ७१.३३ | ६.३० |
| | | **एकूण विभागीय आयुक्त, नाशिक** | | | **२४६७७** | **१२१४९.४६** | **१३७७.३१** |
| **एकूण राज्य** | | | | | **१९२२९०९** | **१५४५२५०.०४** | **१३३९४९.२५** |

रुपये १३३९,४९,२५,०००/-   (रूपये एक हजार तीनशे एकोणचाळीस कोटी एकोणपन्नास लक्ष पंचवीस हजार फक्त)

(संपत सूर्यवंशी)
सह सचिव, महाराष्ट्र शासन